# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** धरमपेठ झोन क्र. २ अंतर्गत मौजा तेलंगखेडी येथील **{सा.बां.वि.झोन क्र. ०२}** व्हेटरनरी कॉलेज ते मोठा हनूमान मंदीर नॉर्थ तेलंगखेडी रोड पर्यंतच्या २४.० मी. रुंद डी.पी. रस्त्याचे कामाकरीता प्रकल्प सल्लागार यांचे नेमणूकीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

धरमपेठ झोन क्र. २ अंतर्गत मौजा तेलंगखेडी येथील व्हेटरनरी कॉलेज ते मोठा हनूमान मंदीर नॉर्थ तेलंगखेडी रोड पर्यंतच्या २४.० मी. रुंद डी.पी. रस्त्याचे काम प्रस्तावीत असून सदर कामाचा खर्च आर्थिक वर्ष २०२२—२३ मध्ये पद क्र. **A**४२००१३७०४०६ मधून प्रस्तावीत आहे. या कामा करीता प्रकल्प अहवाल तयार करण्यास्तव म.न.पा. चे पॅनलवरील प्रकल्प सल्लागार यांचे कडून आवेदन मागविले असता मे. क्रियेशन्स ईंजिनियर्स प्रा. लि. यांची प्री टेंडर कामाकरीता ०.४९५ टक्के कमी दराची तसेच पोस्ट टेंडर कामाकरीता १.४९५ टक्के कमी दराने आवेदन प्राप्त आहे. सदरहु कामा करीता प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर येणा—या प्रकल्प किंमतीच्या आधारे उपरोकक्त मंजूर आवेदनातील दरा नुसार प्रकल्प सल्लागार यांना शासन निर्णय क्र. २०१८/प्र.क्र.५४/नावि—१६ दि. ०४/०६/२०१८ अन्वये निर्देशित केल्यानुसार बिलाचे विविध टप्प्यात देयक प्रदान करण्याचे व प्रकल्प सल्लागार यांना नियुक्ती आदेश देण्याचे मान्यतेस्तव सादर.

टिप :—

1. प्रस्तूत कामास दि. 27/07/2022 अन्वये मा. आयुक्त म.न.पा. यांची मान्यता प्राप्त आहे.
2. सदर कामाचा खर्च **पद क्र. A42001370406** मधुन करण्यात येईल.
3. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- ६०/मनपा/प्रशासक** **दिनांक :- ०५/०८/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, झोन क्र. ०२ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र. २ अंतर्गत मौजा तेलंगखेडी येथील व्हेटरनरी कॉलेज ते मोठा हनूमान मंदीर नॉर्थ तेलंगखेडी रोड पर्यंतच्या २४.० मी. रुंद डी.पी. रस्त्याचे कामाकरीता प्रकल्प सल्लागार यांचे नेमणूकीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

धरमपेठ झोन क्र. २ अंतर्गत मौजा तेलंगखेडी येथील व्हेटरनरी कॉलेज ते मोठा हनूमान मंदीर नॉर्थ तेलंगखेडी रोड पर्यंतच्या २४.० मी. रुंद डी.पी. रस्त्याचे काम प्रस्तावीत असून सदर कामाचा खर्च आर्थिक वर्ष २०२२—२३ मध्ये पद क्र. **A**४२००१३७०४०६ मधून प्रस्तावीत आहे. या कामा करीता प्रकल्प अहवाल तयार करण्यास्तव म.न.पा. चे पॅनलवरील प्रकल्प सल्लागार यांचे कडून आवेदन मागविले असता मे. क्रियेशन्स ईंजिनियर्स प्रा. लि. यांची प्री टेंडर कामाकरीता ०.४९५ टक्के कमी दराची तसेच पोस्ट टेंडर कामाकरीता १.४९५ टक्के कमी दराने आवेदन प्राप्त आहे. सदरहु कामा करीता प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर येणा—या प्रकल्प किंमतीच्या आधारे उपरोकक्त मंजूर आवेदनातील दरा नुसार प्रकल्प सल्लागार यांना शासन निर्णय क्र. २०१८/प्र.क्र.५४/नावि—१६ दि. ०४/०६/२०१८ अन्वये निर्देशित केल्यानुसार बिलाचे विविध टप्प्यात देयक प्रदान करण्याचे व प्रकल्प सल्लागार यांना नियुक्ती आदेश देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**